**भारत – पोलंड परराष्ट्र कार्यालय सल्लामसलतची 11 वी फेरी (01 डिसेंबर 2025)**

02 डिसेंबर 2025

भारत आणि पोलंड यांच्यातील परराष्ट्र कार्यालय सल्लामसलतीच्या (FOC) 11 व्या फेरीचे आयोजन 1 डिसेंबर 2025 रोजी नवी दिल्ली येथे करण्यात आले. भारतीय शिष्टमंडळाचे नेतृत्व परराष्ट्र मंत्रालयातील सचिव (पश्चिम) श्री. सिबी जॉर्ज यांनी केले. तर पोलंड शिष्टमंडळाचे नेतृत्व पोलंडच्या परराष्ट्र मंत्रालयातील राज्य सचिव श्री. डब्ल्यू.टी. बार्टोशेव्हस्की यांनी केले.

2. उभय बाजूंनी द्विपक्षीय संबंधांचा संपूर्ण आढावा घेतला. विशेषतः भारत-पोलंड धोरणात्मक भागीदारीसंदर्भात आणि ऑगस्ट 2024 मध्ये पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांच्या पोलंड भेटीदरम्यान उभय सरकारांनी मान्य केलेल्या कृती आराखडा (2024-2028) संदर्भात चर्चा केली. उभय बाजूंनी डिजिटल पेमेंट सिस्टिम, सायबर सुरक्षा, व्यापार व गुंतवणूक, कृत्रिम बुद्धिमत्ता, सुरक्षा व संरक्षण, संस्कृती व उच्च शिक्षण, कौन्सिलर बाबी आणि नागरिक परस्पर संबंध या क्षेत्रांमध्ये सहकार्य वाढवण्याची आपली बांधिलकी पुन्हा एकदा व्यक्त केली. भारतीय आणि पोलंड शिष्टमंडळाने भारत-पोलंड सामाजिक सुरक्षा कराराची मान्यता लवकरात लवकर घेण्यावर सहमती व्यक्त केली. ज्यामुळे उभय देशांच्या नागरिकांसाठी सामाजिक सुरक्षा संबंधित पोर्टेबिलिटीची सुविधा उपलब्ध होईल.

3. उभय शिष्टमंडळांनी प्रादेशिक आणि जागतिक घडामोडींवर व्यापक चर्चा केली. उभय बाजूंनी पुढील परराष्ट्र कार्यालय सल्लामसलत वॉर्सा येथे परस्पर सोयीच्या तारखेला घेण्यावर सहमती दर्शविली.

**नवी दिल्ली**

02 डिसेंबर 2025